ठाणें



# आपले शेजारी तिबेट

..रा

REFBK-0012998

# आपला शेजारी तिबेट

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थल
अनुक्रम ३८८३८ वि:
क्रमांक नों दि:

★
★ ★

लेखक—रामतनय

REFBK-0012998

ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. १२११
संग्रह माला


१९६२

जगताप-कारले प्रकाशन

१९२ शुक्रवार, पुणें २.

● किंमत ७५ न. पैसे ●

प्रकाशक :
**स. आ. जगताप,**
जगताप-कारले प्रकाशन,
१९२ शुक्रवार, पुणें २.



मुद्रक :
**मा. र. कारले,**
जनसेवा मुद्रणालय,
१९२ शुक्रवार, पुणें २.

# निवेदन

आपला शेजारी तिबेट हें एक प्रवास-वर्णन आहे. यांत भौगोलिक माहिती आलेली आहेच. शिवाय सामाजिक, धार्मिक, राजकीय इत्यादि सर्व प्रकारचें वर्णन थोडक्यांत आलेलें आहे.

सध्यां तिबेटांत चीनचें अधिराज्य आहे. बौद्धांचे धर्मगुरु दलाई-लामा हे निर्वासित होऊन भारतांत आलेले आहेत. त्यांना भारत सरकारनें उचित असा आश्रय दिलेला आहे.

तिबेटांत सोने, चांदीं इत्यादि धातू मुबलक आहेत. ह्या मौल्यवान् धातु खाणींतून काढण्याचें कार्य कठीण असल्यामुळें तें तेथील राज्यकर्त्यांकडून व्हावें तसें झालेलें नाहीं. तथापि सोने, चांदी वगैरेंचा साठा दलाई लामा यांचेजवळ होता. तो तेथील खाणींतीलच आहे. लोकांवर कर लादून तो निर्माण केलेला नाहीं. हीहि गोष्ट या पुस्तकाच्या वाचनानें वाचकांना कळेल, यांत संशय नाहीं.

कैलास पर्वत, मानस सरोवर इत्यादि भारतीय जनतेचीं पवित्र स्थळें तिबेटांत आहेत. तिबेटांत दलाई-लामा असतांना या स्थानाच्या यात्रा भारतीय जनता सुखानें करीत होती. आतां चीनच्या कडक धोरणानें ही स्थिति पालटली आहे. म्हणूनहि हें प्रवास-वर्णन वाचकांना महत्त्वाचें वाटेल.

तिबेटचा प्रश्न आतां यूनोपुढें गेलेला आहे. तेव्हां तेथें तिबेटला न्याय मिळून तिबेट देश स्वायत्त राहील, तर ते भारताला आनंदाचें वाटेल आणि भारताच्या उत्तरेचा शेजारी भारताचा मित्र असल्याचें लवकरच दिसून येईल, एवढी अपेक्षा आपण करूं या.

या पुस्तकाच्या प्रकाशनाच्या कामीं चित्रें, कागद, छपाई इत्यादि उत्तम प्रकारें तयार करून घेतली आणि हें लहान पुस्तक लवकर प्रासिद्ध केलें, याबद्दल प्रकाशकांचे आभार जितके मानावे, तितके थोडेच आहेत.

रामतनय

# रामतनय यांचें वाङ्मय

मोहित्यांची मंजुळा आ. २ री किं. ४ रु.
खरा उद्धार (आ. ७ वी)........२ रु.
साखर गोटी....................५ रु.
प्रमिला बेन....................४ रु.
तिघीजणी (आ. २ री).........३ रु.
तापीतीरीं.......................५ रु.
कॅ. प्रताप भाग १ ला. आ. ३ री १॥ रु.
कॅ. प्रताप भाग २ रा. आ. २ री २ रु.
कॅ. प्रताप भाग ३ रा. २ रु.
गजाभाऊ (आ. २ री) २॥ रु.
अघटित घटना..................२॥ रु.
शापादपि शरादपि [छा. आहे] ३ रु.

## — तरुणांसाठीं व प्रौढ विद्यार्थ्यांसाठीं —

किशोर भारत भाग १ ला—तक्षक व जनमेजय १। रु.
किशोर भारत भाग २ रा—अरुण ते भरत १। रु.
किशोर भारत भाग ३ रा—पुरूरवा ते ययाति १। रु.

## — बाल-वाङ्मय —

परीकथा भाग १ ते ५ प्रत्येकीं किंमत ५० नवे पैसे
मधू नि माधुरी भाग १ ते ३ प्रत्येकीं किंमत ५० नवे पैसे

## — विकास योजनेसाठीं —

टपोरें मोतीं ५० न. पैसे
खरा मंत्र ,, ,,
आमचे सोनगांव ,, ,,
लग्नाची नवी रीत ,, ,,
रामू डोळस झाला ,, ,,
तालीचे गांव ५० न. पैसे
गांव सुधारूं लागले ,, ,,
पुढचें पाऊल ,, ,,
विविध सहकार ,, ,,
पाणीच पाणी ,, ,,

## प्रवास वर्णनें

नाग लोक.................................७५ नये पैसे
आपला शेजारी तिबेट.....................७५ नये पैसे

रामतनय
४६४ नारायण, पुणें २.

अनुक्रम क्रमांक 3263 3266 वि: नों दि:
मराठी ग्रंथ संग्रहालय ... १२९९

# १ : आपले शेजारी

आपण आपल्या घरांत राहातों. तसे दुसरेहि लोक आपापल्या घरीं राहात असतात. आपल्या घरास लागून असलेल्या घरांना आपण शेजारचीं घरें म्हणतों. त्या शेजारच्या घरांत राहाणारे लोकांना आपण आपले शेजारी असें समजतों.

आपला शेजारी चांगला असावा, असें आपणांस वाटतें. शेजारी राहाणारांची आपल्याला सोबत असते. अडीअडचणीच्या वेळीं शेजारी आपल्या उपयोगी पडतात. आपणहि त्यांच्या उपयोगी पडत असतों. शेतकामासाठीं शेजारी शेजारी असणारे शेतकरी एकमेकांस मदत करितात. एकमेकांचे बैल, शेतीचीं अवजारें एकमेकांस देतात. शेजारचे शेतकरी एकमेकांच्या शेतांतील पिकांकडे लक्ष देतात. त्यामुळें चोराचिलटांची भीति कमी असते..

पण शेजारी चांगला नसला, तर तो आपणांस त्रास देतो. वेळोवेळीं नसत्या अडचणी उत्पन्न करीत असतो. एकमेकांचीं मुलेंमाणसें एकमेकांशीं भांडतात. त्यामुळें नेहमींच कचकच चालते.

यासाठीं आपले शेजारी चांगल्या वागणुकीचे असावेत. त्यांनीं परस्परांशीं सहकार्य ठेवावें. आपण आपली वर्तणूक चांगली ठेवावी. म्हणजे आपले शेजारीहि चांगले वागूं लागतील. शेजारधर्म म्हणजे तो हाच. आपले शेजारी चांगले आहेत, याची खूण म्हणजे त्यांची व आपली वागणूक ममतेची आणि सहकार्याची असणें ही होय.

## आपल्या गांवचे व प्रदेशाचे शेजारी :

आपल्या घराजवळच्या शेजाऱ्यांचें महत्त्व आपण पाहिलें. तीच गोष्ट आपल्या गांवाविषयीं आपणास सांगतां येईल. आपल्या शेजारचीं गांवें

सलोख्यानें वागणारीं असावींत. म्हणजे गांवच्या शिवेवरचे तंटेबखेडे होत नाहींत. त्याचप्रमाणें प्रदेशालाहि ही गोष्ट लागू आहे. आपल्या मुंबई राज्याला लागून दुसेर प्रदेश आहेत. दक्षिणेस कर्नाटक आहे. उत्तरेस गुजराथ आहे. पूर्वेस आंध्रप्रदेश आहे. प्रत्येक प्रदेशाची भाषा वेगवेगळी आहे. त्यांच्या चालीरीति निरनिराळ्या आहेत. यांची माहिती आपल्या मुंबई प्रदेशांतील लोकांनीं करून घेतली पाहिजे. प्रांताप्रांतांत सरहद्दीचे मतभेद उत्पन्न होतात. त्यांचा विचार शेजारधर्माप्रमाणें एकमेकांनीं करावयास हवा. असें केलें म्हणजे शेजारच्या प्रदेशाशीं आपले संबंध सलोख्याचे राहातात. यासाठीं शेजारच्या प्रदेशांतील लोकांची माहिती करून घेण्यासाठीं आपण त्यांच्याशीं दळणवळण ठेविलें पाहिजे. प्रत्येक प्रदेशाच्या सुधारणेस एकमेकांनीं हातभार लावला पाहिजे.

आतां प्रवासाचीं साधनें चांगलीं झालीं आहेत. तेव्हां व्यापाराच्या निमित्तानें शेजारच्या प्रदेशाशीं आपण अधिक संबंध ठेविले पाहिजेत. त्या त्या प्रदेशांतील प्रेक्षणीय स्थळें, धार्मिक स्थळें एकमेकांनीं पाहिलीं पाहिजेत. त्यांच्या भाषांचाहि अभ्यास केला पाहिजे. अशा अनेक दृष्टींनीं आपल्या प्रदेशानें शेजारच्या राज्याचा विचार केला पाहिजे.

## भारताचे शेजारी :

आपल्या प्रदेशासंबंधीं आपण विचार केला, तसाच आपल्या भारताच्या शेजाऱ्यांचा विचार आपणांस करावयास हवा. भारतांतील सर्व प्रदेशांशीं आपला निकटचा संबंध येतो. कामधंद्याच्या निमित्तानें आपण भारतभर जात येत असतों. त्यामुळें भारतांतील लोकांची माहिती आपणास होऊं शकते. दिल्लीला पार्लमेंटची म्हणजे संसदेची बैठक नेहमीं चालू असते. तेथें निरनिराळ्या राज्यांचे प्रतिनिधि एकत्र येतात. पार्लमेंटमध्यें अनेक प्रश्नांची चर्चा करतात. त्यामुळें आपणांस भारतांतील अनेक प्रदेशांची माहिती कळते. निरनिराळ्या सुधारणा समजतात. भारतांतील लोकांची एकजूट आहे, हें सर्वांच्या नजरेला येतें.

आपला भारत फार मोठा देश आहे. जगांत भारताची योग्यता मोठी आहे. प्राचीन काळापासून येथें चांगल्या विचाराचे लोक राहात आलेले आहेत. त्यांचें तत्त्वज्ञान फार मोलाचें आहे. भारतांतील तत्त्वज्ञानास जगांतील

विद्वान् लोक फार मान देतात. भारतांतील प्राचीन ग्रंथांचा अभ्यास जगभर होत असतो.

अशा या भारतास कांहीं शतकें पारतंत्र्यांत पडावें लागलें होतें. आतां १९४७ पासून त्यास स्वातंत्र्य लाभलें आहे. त्यामुळें भारताच्या शेजारचीं राष्ट्रें कोणतीं आहेत? त्यांचे व आपले शेजार धर्माचे संबंध कसे आहेत? त्यांच्यांत व आपल्यांत स्नेहधर्म कसा वाढविला पाहिजे? एकमेकांनीं सहकार्यानें कां वागलें पाहिजे? त्यासाठीं आपल्या राष्ट्रानें कोणत्या गोष्टी केल्या पाहिजेत? एकमेकांच्या राज्यांत जाणत्या लोकांनीं कोणत्या कारणासाठीं प्रवास केला पाहिजे? इत्यादि माहिती भारताच्या शेजारच्या राष्ट्रांची आपणांस पाहिजे. असें केलें, म्हणजेच परस्परांनीं शेजारधर्म योग्य प्रकारें पाळला, असें म्हणतां येईल.

आपल्या भारताच्या पूर्वेस ब्रह्मदेश आहे. भारताचे आणि ब्रह्मदेशाचे संबंध सलोख्याचे आहेत. ब्रह्मदेशांतील बहुतेक लोक बुद्ध धर्माचे आहेत. त्या देशांत भारतांतील हिंदी लोक पुष्कळ आहेत. पूर्वी हा ब्रह्मदेश भारतांतच होता. इंग्रजांनीं तो प्रदेश १९३५ सालीं वेगळा केला ! त्यापूर्वीं त्या देशाशीं आपले व्यापारी व सरकारी कामकाज भारतांतील दुसऱ्या प्रांताप्रमाणें होत असे. ब्रह्मदेशांतील रंगूनचा तांदूळ इकडे भरपूर येत असे. सरकारी अधिकारी इकडचे तिकडे जात असत. तिकडचे इकडे येत असत.

आतां तशी स्थिति राहिली नाहीं. ब्रह्मदेशाचा परवाना घेऊनच त्या देशांत आपणांस जातां येतें. ब्रह्मदेशांतील बुद्ध लोक गयेच्या यात्रेस येतात. किंवा व्यापाराच्या निमित्तानें भारतांत येतात. तेव्हां त्यांनाहि भारताचा परवाना घ्यावा लागतो.

पंचवीस वर्षांपूर्वीं मी ब्रह्मदेशांतून फिरलों होतों. लोकमान्य टिळकांना मंडाले येथील कारागृहांत ठेविलें होतें, तेंहि ठिकाण मीं पाहिलें होतें. येथें मला ब्रह्मदेशाची अधिक माहिती द्यावयाची नाहीं. तो देश भारताचा शेजारी आहे. त्याचा व भारताचा स्नेहभाव आहे, एवढेंच आपणांस लक्षांत ठेवावयाचें आहे.

### भारताचा शेजारी सिलोन म्हणजे लंका :

भारताच्या दक्षिणेस एक मोठें बेट आहे. त्याला भारतांतील लोक लंका म्हणतात. प्राचीन काळीं रामायणांतील रावण या बेटांत राज्य करीत होता, अशी आपली समजूत आहे. ह्या बेटांतील लोकांना सिंहली लोक असें म्हणतात. म्हणून त्या बेटाचें नांव सिंहलद्वीप असें पडलें असावें. या सिंहली लोकांचा धर्म बौद्ध आहे. ह्या बेटाची राजधानी कोलंबो आहे. ह्या बेटांत मद्रासच्या बाजूचे तामीळ लोक पुष्कळ आहेत. त्यामुळें भारताचा व सिलोनचा संबंध निकटचा झालेला आहे. हें बेट ब्रिटिशांच्या ताब्यांत होतें. अलीकडे भारताप्रमाणें त्या देशालाहि स्वातंत्र्य मिळालेलें आहे.

लंकेतील लोक तीर्थयात्रेसाठीं भारतांत येतात. व्यापारासाठींहि ते

इकडे येतात. तेव्हां त्यांना परवाना घ्यावा लागतो. भारतांतील लोक लंकेस गेले, तरी त्यांनाहि परवाना घेऊनच जावें लागतें. भारताचे व सिलोनचे संबंध सलोख्याचे आहेत. म्हणजे दोन्ही देश शेजार-धर्म चांगला पाळतात.

## भारताचा शेजारी पाकिस्तान :

भारताच्या पश्चिमेस पाकिस्तान आहे. १९४७ सालीं भारताची फाळणी झाली, त्यापूर्वीं सध्यांचा पाकिस्तान देश भारतांतच होता.

पश्चिमेच्या बाजूचे सिंध, बलुचिस्तान, सरहद्दप्रांत व अर्धा पंजाब हे प्रदेश पश्चिम पाकिस्तानांत आहेत. त्याचप्रमाणें पूर्वेस बंगालचा विभागलेला भाग पाकिस्तानांत मोडतो. भारतांतील आचारविचार, भाषा हीं पूर्वीप्रमाणेंच पाकिस्तानांत आहेत. माणसें तींच आहेत. एकाच घरचे भाऊ वेगळे होतात. निराळा संसार थाटतात. तशी स्थिति पाकिस्तानची झाली आहे. पण पुढें भावाभावांत तेढ उत्पन्न होते. त्यांच्यांत भाऊबंदकी वाढीस लागते. तशी स्थिति पाकिस्ताननेंहि केली आहे ! त्यामुळें भारत व पाकिस्तान ह्या दोघांत असावा तसा सलोखा दिसून येत नाहीं.

भारत आपल्या परी शेजारच्या पाकिस्तानशीं आपुलकीनें वागण्याचा प्रयत्न करितो, पण पाकिस्तानकडून त्याला दुजोरा मिळत नाहीं ! उलटी एकसारखी तेढच तो देश वाढवीत जात आहे.

पंचवीस तीस वर्षांपूर्वीं मी सिंध, पंजाब, सरहद्द प्रांत इकडे हिंडून आलों होतों. खैबर खिंडीपर्यंतहि गेलों होतों. लाहोर, कराची, क्वेट्टा हीं शहरें किती सुंदर होतीं ! रावळपिंडीचें हवामान मला कितीतरी आरोग्यदायक वाटलें ! इकडे पश्चिमेच्या बाजूचें पाकिस्तानहि फार सुपीक आहे. सर्व लोक बंगाली भाषा बोलतात. डाक्का शहर वैभवशाली आहे. पूर्व पाकिस्तानांतील चितगांग बंदर तसेंच पश्चिम पाकिस्तानांतील कराची बंदर हीं उत्तम बंदरें म्हणून प्रसिद्ध होतीं. हल्लींहि तशीच स्थिति आहे. पण पाकिस्तानच्या राज्यकर्त्यांना भारताविषयीं आपलेपणा वाटत नाहीं. शेजार-धर्मांतील सहकार्य, सहजीवन तूर्त तरी तेथें दिसत नाहीं.

## भारताच्या उत्तरेचा शेजारी तिबेट :

आतांपर्यंत भारताच्या शेजारच्या देशांची थोडक्यांत आठवण करून दिली. या देशांची माहिती आपणांस प्रत्यक्ष प्रवासानें घेतां येऊं शकते. निरनिराळ्या ग्रंथांत यांची माहिती भरपूर आहे. पण उत्तरेकडील आपला शेजारी जो तिबेट देश त्याची माहिती आपणांस फार थोडी असते. कारण तिकडे प्रवास करण्यासारख्या सोई नाहींत. आणखी पुष्कळ अडचणी आहेत. त्या मी सांगणारच आहें.

त्या तिबेटांत शक्य तितका प्रवास करावा, अशी कल्पना माझ्या मनांत पुष्कळ दिवस होती. मी नेपाळांत जाऊन पशुपतीश्वराचें दर्शन घेतलें होतें. त्या देशांत मी बराच प्रवास केला होता. हिमालयांतील बरींच तीर्थक्षेत्रें मीं पाहिलीं होतीं. बदरीकेदार, बदरीनारायण या प्रसिद्ध क्षेत्रांच्या यात्रा मी केल्ल्या होत्या. गंगोत्री, जम्नोत्रीपर्यंत जाऊन त्या तीर्थांत मीं स्नानहि केलेलें होतें. हिमालयांतील कडक थंडीचा मी अनुभव घेतलेला होता. बिकट वाटांतून मी उंच उंच कडे चढून गेलों होतों ! हिमप्रदेशांतून मी प्रवास केला होता. असा प्रवास मला आनंददायक वाटतो.

असल्या प्रवासांत अनेक प्रकारचें ज्ञान मिळतें. निरनिराळ्या तऱ्हेचे लोक पाहावयास मिळतात. त्यांच्या विविध- प्रकारच्या चालीरीति कळतात. त्यांच्या कष्टाच्या जीवनाची कल्पना येते.

हिमालयांतील निरनिराळ्या उंचीवर निरनिराळें सृष्टिसौंदर्य दिसून येतें. तें पाहात असतां मन रमून जातें. आपल्या देहाचें सार्थक झालें असें आपणांस वाटतें.

अनेक तपस्वी हिमालयांत दिसून येतात. त्यांचा सहवास घडण्याचे प्रसंग येतात. त्यामुळें मनाला शांतिहि प्राप्त होते.

हिमाल्याचें वर्णन मी किती करूं? पुष्कळ प्रवाशांनीं तें केलेलें आहेच. मला आतां हिमालयाच्या पलीकडच्या प्रदेशांत प्रवास करावयाचा आहे. म्हणजे आपला शेजारी तिबेट पाहावयाचा आहे.

—:○:—

# ३ : तिबेटकडे निघालों

तिबेट देश कोठें आहे, हें आपण प्रथम पाहूं. आपल्या भारताच्या उत्तरेस हिमालय पर्वत आहे. हें सर्वांना माहीत आहे. त्याच्याहि पलीकडे हा तिबेट देश आहे.

हिमालयाचें सर्वांत उंच शिखर गौरीशंकर हें आहे. त्याची अजमासें उंची एकोणतीस हजार फूट आहे म्हणजे तें शिखर साडेपांच मैल उंचीवर आहे. एवढ्या उंचीचा पर्वत पृथ्वीवर दुसरा नाहीं.

ही उंची एका उंच शिखराची झाली. सर्वच शिखरें इतक्या उंचीची नाहींत. त्यापेक्षां कमी उंचीचीं आहेत. साधारणपणें वीसहजार ते एकोणतीस हजार याच्या दरम्यान कितीतरी शिखरें आहेत. पण हिमालयाची उंची सर्वसाधारणपणें वीस हजार फूट आहे. आपल्या सह्याद्रीची सरासरी उंची तीन हजार फूट आहे. म्हणजे आपले सहासात सह्याद्रि एकावर एक ठेविले पाहिजेत, तेव्हां ही उंची हिमालयाच्या सरासरी उंची इतकी होईल ! इतका उंच हिमालय पर्वत आहे ! त्याची रुंदी सुमारें दोनशें मैल तरी आहे. तेव्हां अशा लांबीचा व उंचीचा पर्वत ओलांडून पलीकडे जाणें फार त्रासाचें आहे.

शिवाय हिमालय ओलांडतांना पर्वतांतील खिंडींतून जावें लागतें. ह्या खिंडीहि अत्यंत बिकट आहेत.

## इंग्रज व तिबेट :

मी बरेच दिवस विचार करीत होतों. इंग्रज सरकारचा परवाना मिळवून तिबेटांत जावें, असा एक विचार माझ्या मनांत आला. ब्रिटिशांचे राजदूत तिबेटच्या ल्हासा राजधानींत होते. तिबेटशीं व्यापाराचा संबंध ठेवणारे आपलेकडील व्यापारी होते. ह्या व्यापारी लोकांतून प्रवास करावा, अशी एक कल्पना माझ्या मनांत आली. पण तिबेटी लोकांचें खरें जीवन मला पाहावयाचें होतें. तें जीवन ओझरतें कां होईना, पाहाण्याची मला इच्छा होती. ती अशा व्यापाऱ्यांबरोबरच्या एकांगी प्रवासानें भागणारी नव्हती.

ल्हासाला पोस्टाची सोय आहे, ब्रिटिशांचे लष्करी ठाणें तेथेंच जवळपास

आहे. ब्रिटिशांचे राजदूतहि प्रवाशांना मदत करितात. त्यामुळें पत्रव्यवहार व सुरक्षितता यांची व्यवस्था ठीक आहे, असेंहि मला वाटलें.

१९४३ च्या सुमारास दुसरें महायुद्ध चालू होतेंच. त्या गडबडींत मी प्रवास करूं नये, असेंहि माझे मित्र मला सांगत होते. पण माझ्या मनानें प्रवास करण्याचा निश्चयच केला होता. त्या संधीस आणखीहि एक गोष्ट घडून आली.

## गंगा व ब्रह्मपुत्रा :

मी गंगेच्या कांठच्या हरिद्वारपर्यंत आलों होतों. तेथून हृषिकेश नजीक आहे. त्या ठिकाणाहून कांहीं यात्रेकरू उन्हाळ्यांत कैलास पर्वत व मानस-सरोवर यांच्या यात्रेस जाणार आहेत, असें मला समजलें. वर्षांतून एक महिना मी अलीकडे हरिद्वारला गंगेच्या कांठीं वास्तव्य करीत असें. अंगास भस्म फासून मीं साधूसारखाच वागत असें.

हरिद्वाराहून एक यात्रेकरू कैलास व मानस सरोवर यांच्या यात्रेस जाणार होता, त्यांच्याशीं मी विचार विनिमय केला. पण त्यांच्याबरोबर जाण्याचा माझा निश्चय होईना. तेव्हां तो मला म्हणाला,

" मानस सरोवराचें महत्त्व तुम्हांला माहीत आहे का? त्या सरोवराचें वर्णन बहुतेक पुराणांत आलेलें आहे. त्या सरोवराचें पाणी अमृतासारखें मधुर आहे. राजहंसांचें तेथें वास्तव्य असतें, असें म्हणतात !"

" होय !" मी त्या इसमास म्हटलें, " मला त्या सरोवराचें महत्त्व माहीत आहे. तेथूनच सिंधु, सतलज या प्रसिद्ध नद्यांचे उगम झालेले आहेत. तेथें उत्तरेस कैलास पर्वत आहे. तेथूनच पांडव स्वर्गास गेले, असेंहि महाभारतांत सांगितलें आहे !"

" मग तर तुम्हांला पुष्कळच माहिती आहे. तेव्हां माझ्याबरोबर तिकडच्या यात्रेला चला ना? मात्र गंगोत्री करूनच तिकडे मी आणि दुसरे कांहीं यात्रेकरू जाणार आहोंत !"

" मी गंगोत्रीला जाऊन आलों आहें." मी सांगूं लागलों " खरें म्हटलें, तर चीनकडे जाणाऱ्या मोठ्या नद्या आणि भारतांतील मोठ्या नद्या यांचा उगम तिबेटांत आहे ! मानस सरोवर तिबेटांत आहे ! कैलास पर्वतहि तिबेटांतच आहे. फार कशाला ? गंगानदी प्राचीनकाळीं तिबेटाकडेच वाहात

जात होती ! तिला भारतांत वळवून आणली भगीरथ राजानें ! म्हणून तिला भागीरथी म्हणतात ! ब्रह्मपुत्रा नदी तिबेटांत उगम पावते. हिमालयाला वळसा घालून ती भारतांत येते. आसाम प्रांतांतील तिचा पराक्रम तुम्हांला माहीत आहे ना ? तिच्या भयंकर पुरानें तिकडे हाहा:कार उडतो ! ”

“ तें असो ! मग तुमचे विचार आम्हांला सांगतां का ? ” तो गृहस्थ म्हणाला.

## आर्यांचाच देश त्रिविष्टप म्हणजे तिबेट :

“ मी सांगतों ऐका. ” मी म्हटलें, “ मला तिबेटांत प्रवास करावयाचा आहे. तो देश मला पहावयाचा आहे. भारताच्या शेजारचा तो देश आहे. त्या देशाचें प्राचीन नांव त्रिविष्टप असें होतें. त्रिविष्टप म्हणजेच स्वर्ग. प्राचीन काळचा स्वर्ग तिकडेच कोठें तरी असावा ! त्या वेळीं तेथें आर्यांचें वास्तव्य असावें !

आतांचा बौद्ध धर्म प्राचीन काळीं तेथें नव्हता. तो धर्म अलीकडचा आहे. भारतांतील अशोकासारखे बुद्धधर्मी राजे जगभर बुद्ध धर्माचे भिक्षु पाठवीत होते. ते भिक्षु जिकडे तिकडे बुद्ध धर्माचा प्रसार करीत. तसाच तिबेटांत बुद्ध-धर्माचा प्रसार झाला ! आतां तर तिबेटांतील बुद्ध धर्माच्या गुरूंना सर्व बुद्धधर्माचे लोक फार मानतात. त्या धर्मगुरूंना लामा म्हणतात.”

“ बरें तर ! ” तो गृहस्थ म्हणाला, “ आम्ही गंगोत्री व जमनाच्या यात्रा प्रथम करितों. नंतर जमेल तसें मानस सरोवराची यात्रा करूं. ” असें बोलून त्या गृहस्थानें माझा निरोप घेतला.

## तिबेटचें पठार :

नंतर मी बारकाईनें तिबेटची माहिती करून घेऊं लागलों.

हिमालयांतील उत्तरेचा भाग वीस पंचवीस हजार फूट उंचीचा आहे. तेथून पुढें उतार आहे. त्याच खोलगट भागांतून नद्यांचा उगम होतो. त्या नद्या भारतांत येतातच. शिवाय ब्रह्मदेश, चीन इकडेहि कांहीं नद्या वाहातात. चीनची गंगा म्हणजे **यांगत्सीकँग** नदी तिबेटांतच उगम पावते. उत्तर चीनला संपन्न करणारी नदी **होअँगो** ही सुद्धां तिबेटांतच जन्म पावते.

चीनच्या दुसऱ्या लहान नद्यांचें उगमाचें स्थान तिबेटच आहे. ब्रह्मदेशांतील प्रसिद्ध नदी **ब्रह्मपुत्रा** आणि **चिंदाविन** आदिकरून दुसऱ्या लहान नद्या ह्यांचा उगम तिबेटांतून झालेला आहे.

असें हें तिबेटचें पठार बारातेरा हजार फूट उंचीचें आहे. या पठाराचें क्षेत्रफळ अजमासें सात-आठ लाख चौरस मैल आहे. म्हणजे सध्यांच्या भारताच्या क्षेत्राच्या अजमासें दोन तृतीयांश हा तिबेट देश आहे. पण या प्रदेशाची लोकसंख्या एक कोटी देखील नाहीं ! फार तर सत्तर ऐंशी लाख असेल. या देशांतील लोक मागासलेले असल्यामुळें निश्चितपणें लोकांची संख्या कळत नाहीं. आगगाड्या तर नाहींतच, पण मोटारच्या वाहतुकीस उपयोगी पडतील, असे रस्तेहि तिकडे नाहींत.

या प्रदेशाच्या उत्तरेसहि पर्वत आहेत. चोहोंबाजूंनीं पर्वतांच्या रांगा आहेत म्हणजे सर्व बाजूंनीं पर्वत असलेलें हें जरा खोलगट पठार आहे. तिबेटच्या उत्तरेचे पर्वत हिमालयासारखे उंच नाहींत. ते कमी उंचीचे आहेत.

या प्रदेशाची हवा मात्र फार थंड आहे. उत्तरेकडून थंडगार वारे येतात. त्यामुळें ह्या प्रदेशाची हवा अधिक थंड झालेली आहे. भारताच्या हिमालय पर्वताची रांग उंच आहे. ती उत्तरेकडील थंडगार वाऱ्यांना अडवीत असते. तिबेटांत थंडगार वाऱ्यांना अडविणारे उत्तरेस उंच पर्वत नाहींत ! त्यामुळें त्या देशास ह्या वाऱ्यांचा फार त्रास होत असतो. जवळ जवळ सहा महिने तिबेटांत हिंवाळा असतो. त्यावेळीं तो प्रदेश बर्फमय असतो. उन्हाळा सुरू झाला म्हणजे तें बर्फ वितळतें. हिमालय पर्वतांतून हिमनद्या वाहात असतात. त्या शेवटीं वितळतात. त्यामुळें नद्यांना पूर येतात. बर्फ वितळल्यानें खोलगट भागांत पाणी सांचतें. त्यामुळें त्यांची लहान लहान सरोवरें बनतात. म्हणूनच तिबेटांत गोड्या पाण्याचीं सरोवरें पुष्कळ आहेत.

तिबेटचा प्रदेश उत्तर अक्षांश २७° ते ३७° च्या दरम्यान आहे. तेव्हां अर्थात् काश्मीरच्या हवामानासारखें येथील हवामान असेल असें वाटतें. काश्मीरांत थंडीच्या दिवसांत बर्फ पडतें. पण उन्हाळ्यांत इतकी कडक थंडी नसते. त्यामुळें तो प्रदेश सृष्टिसौंदर्यानें बहरलेला असतो.

तिबेटांत काश्मीरसारखी सृष्टिशोभा आढळावयाची नाहीं. कारण वनस्पतीच्या वाढीला तें थंडगार हवामान फारसें अनुकूल नाहीं. उन्हाळ्यांतील उष्णतामान ६०° ते ७०° अंशांच्या पलीकडे कधींच जात नाहीं.

दक्षिणेचा भाग हिमालयास लागून आहे. तिकडे १५ ते २० इंचांपाऊस पडतो. पुढें तिबेटांत उत्तरेस जसजसें जावें, तसें पावसाचें मान कमी कमी होत जातें.

सर्व प्रदेशांत दऱ्याखोरीं पुष्कळ आहेत. त्यामुळें तेथील लोकांना मोठे कष्टानें दिवस काढावे लागतात.

मी अशी सर्वसाधारण तिबेटची माहिती करून घेतली. नंतर मी मानससरोवरास कोणत्या मार्गानें जावें, याचा विचार केला.

## तिबेट व बौद्धभिक्षु :

मी तिबेटांत जाण्याची तयारी चालविली. बौद्ध भिक्षूंबरोबर तिबेटांत गेल्यास प्रवासांत अडचण उत्पन्न होणार नाहीं. तिबेटांत बौद्ध भिक्षूंना मान देतात. तेव्हां मीहि बौद्ध भिक्षूचा वेष केला ! भिक्षूंच्या आचाराची माहिती करून घेतली; आणि दोघांतिघां बौद्धभिक्षूंच्या संगतीनें तिबेटचा प्रवास करण्याचें ठरविलें.

तिबेटांतील राज्यकर्ते परक्या देशांतील लोकांना आपल्या देशांतून प्रवास करूं देत नाहींत. पण मी ज्यांच्याबरोबर तिकडे जाणार होतों, त्या भिक्षूंनीं सर्व व्यवस्था आम्हीं करतों, तुम्हांला त्रास होऊं देणार नाहीं, असें मला आश्वासन दिलें. मात्र तिबेटी भाषा तुम्ही कामापुरती शिकावी, असेंहि त्यांनीं मला सांगितलें.

त्या भिक्षूंनीं दोन तीन वेळां तिबेटांत प्रवास केला होता. ते ल्हासाला लामाच्या दर्शनास जात असत. त्यांना तिबेटी भाषा येत होती. तेव्हां मी त्यांच्याजवळ कांहीं दिवस तिबेटी भाषा शिकलों.

कांहीं युरोपियन लोकांनीं तिबेटांतून प्रवास केला होता. मोठ्या खटपटीनें त्यांनीं त्या सरकारची परवानगी मिळवूनच तिबेट देश पाहिला होता. ब्रिटिश बुद्ध मिशनचे **डॉ. एम्. गोव्हर्न** यांनीं खुद्द तिबेटच्या ल्हासा राजधानींत १९२३ मध्यें प्रवेश केला होता.

यापूर्वी **श्रमण एकई कायागुची** नांवाचा प्रवासी तिबेटांत गेला होता. तो त्या देशांत तीन वर्षें राहिला होता. त्यानें आपलें प्रवासवर्णनहि लिहून ठेविलें आहे. त्याचें इंग्रजी भाषांतर १९०१ मध्यें मद्रासला प्रसिद्ध झालें आहे. तें मीं वाचलें. आणखी दुसऱ्या लोकांकडूनहि प्रवासासंबंधीं बरीच माहिती मिळविली. माझ्याबरोबर येणाऱ्या भिक्षूंच्या खर्चाची तजवीज मी केली; आणि आम्ही हरद्वारहून बद्रीनाथाच्या वाटेनें तिबेटच्या प्रवासास निघालों.

—:-□-:—

# ४ : हिमालयांतील प्रवास व कैलास पर्वत

मला हा प्रवास भिक्षूंच्या बरोबर करावयाचा होता. ते भिक्षू दणदणीत प्रकृतीचे होते. त्यांना हिमालयांतून जाण्यायेण्याचा चांगला सराव होता. त्या मानानें माझी प्रकृति तितकीशी दणकट नव्हती. माझ्या मित्रांनीं जरूर ते जिन्नस हरिद्वारला खरेदी केले होते. प्रथम प्रथम त्यांनीं ओझ्यासाठीं घोडीं घेतलीं होतीं. मला बसण्यासाठीं त्यांनीं घोडेंच ठरविलें होतें !

हिमालयांतून जातांना प्रथम प्रथम अत्यंत सुंदर सृष्टिशोभेचें दर्शन झालें. पण आम्ही जसजसे पुढें जाऊं लागलों, तसतसा बिकट मार्ग लागला. उत्तुंग बर्फमय शिखरांचें दर्शन आम्हांस होत असे. त्याचप्रमाणें पाताळाची कल्पना येईल अशा अत्यंत खोल दऱ्या आमच्या वाटेंत होत्या. घोड्यांचा पाय केव्हां घसरेल आणि आपला मोक्ष केव्हां होईल, याची सारखी धुगधूग माझ्या अंतःकरणांत होत होती. त्यामुळें घोड्यावर बसण्याऐवजीं पायींच प्रवास करणें बरें, असें मी ठरविलें.

मी येथें माझ्या प्रवासाची दैनंदिनी देत नाहीं. मला एवढेंच सांगावयाचें आहे कीं, हिमालयांतील बिकट दऱ्याखोऱ्यांतून प्रवास करणारा मनुष्य धीट असावा लागतो. भीतीनें गांगरून जाणारास प्रवास सुखाचा होत नाहीं. वाटेंत अनेक नद्या ओलांडाव्या लागतात. कडक थंडीला तोंड द्यावें लागतें. हिमनद्यांच्या प्रवाहांची शोभा पाहावयास सांपडते. पण त्या ओलांडून जातांना अत्यंत सावधगिरीनें जावें लागतें.

आमचे नोकर असल्या प्रवासास चांगले मुरलेले होते. आणि भिक्षू तर काय धार्मिक भावनेनें जप करीत करीत निर्भयपणें मार्ग क्रमीत होते. माझी सर्व प्रकारची काळजी ते घेत होते. आम्ही वाटाड्यांनीं दाखविलेल्या मार्गानें बद्रीनाथला जाऊन पोहोंचलों.

आमचा हा प्रवास उन्हाळ्यांतील असल्यामुळें बद्रीनाथला यात्रेकरूंची गर्दी झालेली दिसत होती. बद्रीनाथचा कार्यक्रम उरकून आमच्या भिक्षुमित्रांनीं गंगोत्रीस जाण्याचा मार्ग धरला.

बद्रीनाथपासून गंगोत्री बरीच दूर आहे. पण पवित्र भागिरथीचा उगम तेथूनच होतो. तेव्हां पुन्हा तें स्थान पाहण्याचा योग येत आहे, याचा मला आनंदच वाटला.

गंगामातेचें दर्शन घेण्यांत विलक्षण समाधान वाटतें. कैलासांतून गंगा पृथ्वीवर आली. प्रथम भगवान् शंकराच्या मस्तकांतील जटेंत तिनें आश्रय घेतला. नंतर ती त्यांच्या जटेंतून बाहेर पडली. ही कथा मोठी रमणीय आहे आणि बोधप्रदहि आहे.


गंगेच्या उगमाकडे चिकित्सेनें पाहिलें म्हणजे असें दिसतें कीं, ब्रह्मपुत्रा नदीप्रमाणें ही नदी तिबेटांतून वाहात जावयाची. पण भगीरथ राजानें भारताकडे तिचा प्रवाह वळविला, हें मागें सांगितलेंच आहे.

नंतर आम्ही यमुनोत्रीकडे निघालों. तेथूनच यमुना नदीचा प्रवाह सुरू होत असतो. मूळचा प्रवाह लहान व आटोपशीर दिसतो. पण पुढें या प्रवाहाला भव्य स्वरूप प्राप्त होत गेलें आहे. हिमाल्यानें या नदीला पोसलें आहे. हिमनद्यांच्या आणि बर्फाच्या वितळण्यानें ही नदी पुढें पुढें भरदार होत गेलेली आहे. कृष्णचरित्रामुळें गंगेपेक्षांहि यमुनेला अधिक लोकप्रियता लाभलेली आहे. तिच्या उगमाजवळचा भव्य देखावा मी डोळे उघडे ठेवून पाहिला आणि डोळे मिटून घेऊन अंतःचक्षूनें तो हृदयांत भरून ठेविलेला आहे. माझे भिक्षुमित्र स्नान, जप, भस्मधारणा, बौद्धधर्मांतील तत्त्वज्ञान यांत मग्न होऊन गेलेले होते. प्रातःकालीं चकाकणारें बर्फमय पर्वताचें दर्शन मनाला अवर्णनीय आनंद देणारें असतें. याचा अनुभव प्रत्यक्ष यात्रा करणारालाच मिळत असतो.

यमनोत्रीनंतर आम्ही कैलास पर्वताकडे जाण्यास निघालों. आतां हिमाल्याच्या उंचच्या उंच पर्वतराजीमधून खालीं उताराकडे जावयाचें होतें. तिबेटांत जाण्याचे मार्ग येथूनच सुरू होतात. जमनोत्रीवरून आम्ही पुढें सरकत असतां आम्हांला कस्तुरी मृग दिसले. केवढे मोठे ते मृग! त्यांच्या बेंबींतून बहुमोल सर्वत्र सुगंधमय करून टाकणारी कस्तुरी निर्माण होते. या कस्तुरीचा व्यापार करणारे आम्हांला तिबेटच्या सरहद्दीवर भेटले.

येथेंच आम्हांला याक या उपयोगी जनावराची अधिक ओळख झाली. केसाळ आणि अत्यंत गुबगुबित अशी आपल्याकडील गाई-बैलांसारखी ती जात आहे. हा पशु म्हणजे तिबेटची कामधेनुच होय. मृदु केस, दूध आणि मांस

इत्यादि पदार्थ तिबेटी जनतेला हाच प्राणी देत असतो. येथें हेंहि सांगितलें पाहिजे कीं, तिबेटी जनता शुद्ध शाकाहारी राहूं शकत नाहीं ! मेंढ्या, याक इत्यादि पशूंचें मांसावर त्यांना आपला वहुतेक निर्वाह चालवावा लागतो.



याक

आम्ही कैलास पर्वताजवळ आलों. तो बर्फमय पर्वत होय. बावीस हजार फूट त्याची उंची आहे. याच पर्वतावरून पांडव स्वर्गास गेले असें महाभारतांत सांगितलें आहे. अर्थात् तें त्यांचें स्वर्गांत जाणें जड देहाचें नसून सूक्ष्म देहाचें असलें पाहिजे हें उघड आहे.

—:o:—

कैलास पर्वताचें दर्शन आम्ही घेतलें. तेथून नजीकच रावणह्रद सरोवर आहे, तेंहि आम्ही पाहिलें. तेथूनच सिंधु नदी निघते. ती काश्मिरांत शिरून पुढें वाहात जाते. पवित्र नद्यांचें आपण स्मरण करितों. तेव्हां गंगेचें नांव घेतलें कीं, दुसरें सिंधुचेंच नांव येतें. इतकें महत्त्व आपले पूर्वज त्या नदीस देत आलेले आहेत.

पुढें आम्ही मानस सरोवराच्या वाटेस लागलों. तिबेटांत प्रवेश केल्यापासून आम्ही तिबेटी वाटाडे घेतले होते. ते शरिरानें चांगलें दणकट होते. त्यांच्या याक जनावरावर आम्हीं आमचें सामान लादलें. त्यांच्यावर बसूनच आम्ही आमचा पुढचा प्रवास चालू केला. तिकडे घोडे, उंट हींहि प्रवासाचीं साधनें आहेत. तिकडील श्रीमंत लोक घोडीं वापरतात. उंटहि श्रीमंतांलाच वाळगण्यास परवडतात. सामान्य लोकांना प्रवासासाठीं याकचा फार उपयोग होतो.

आम्हांला आतां मधून मधून तिबेटी लोक दिसूं लागले.

## तिबेटी लोक :

तिबेटी लोक मुख्यतः मंगोलियन वंशाचे आहेत. त्यामुळें साधारणपणें ते चिनी लोकांसारखेच दिसतात. ब्रह्मदेशचे लोक आणि आर्य लोक यांच्याशीं त्यांचे फार प्राचीन काळापासून शरीरसंबंध होत आले आहेत. त्यामुळें त्यांचीं नाकें चिनी लोकांसारखीं अगदीं बसकीं नाहींत. नेपाळी लोकांसारखी जरा उचललेलीं दिसतात. त्यांचा चेहरा पसरट असतो. त्यांचीं गालाचीं हाडें वर आलेलीं दिसतात. डोंकीचे केस लांब असतात. पुरुषांच्या मिशा लहान आणि विरळ असतात. त्यांचे डोळे काळेभोर व तेजस्वी असतात.



याकवरून प्रवास

आम्हांस मध्यंतरीं कांहीं गांवें लागलीं. तेव्हां आमच्या वाटाड्यांनीं तेथील लोकांची ओळख करून दिली. तिकडील सरदारांच्या बायका आपल्याकडील सुंदर बायकां-सारख्या असतात ! जिकडे पाहावें तिकडे सरोवरें असतात. त्या सरोवराचें पाणी भरण्यास क्वचित अशा सुंदर स्त्रियाहि आलेल्या असतात ! जणूं त्या पुराणांतील अप्सराच होत, असेंहि वाटतें !


सरदार घराण्यांतील सुंदर स्त्री

## मानस सरोवर दर्शन :

आम्ही मजल दरमजल करीत मानस सरोवर गांठलें. याच सरो-वराचें वर्णन आपल्या पुराणांतून आढळतें. राजहंसांचें वास्तव्य तेथें असतें असें म्हणतात. पुराणांत वर्णन केलेले ते सोन्याचे राजहंस तेथें आम्हांला दिसले नाहींत. पण पांढरेशुभ्र तेजस्वी, मन वेधून घेणारे, पक्षीं तेथें आम्हांला दिसले. तेच हंस आम्हो समजलों.

तिबेटांतील हें सरोवर बरेंच मोठें आहे. सरोवर गोड्या पाण्याचें आहे. तिब्रेटांतील सर्वच सरोवरें गोड्या पाण्याचीं आहेत. तिबेटच्या विस्तृत पठारांत जे खोलगट भाग आहेत. तेथेंच हीं सरोवरें बनलेलीं आहेत. पावसाचें पाणी या सरोवरांना फारसें मिळत नाहीं. कारण तिबेटच्या हिमालयाकडील भागांतच फारतर पंधरावीस इंच पाऊस पडतो. उत्तरेच्या भागांत तर आठ दहा इंच पाऊस पडत असेल. पण थंडीच्या दिवसांत सर्व तिबेटभर हिमवर्षाव होत

असतो ! उन्हाळ्यांत हें बर्फ वितळतें आणि त्याच्या स्वच्छ पाण्यानें लहान मोठीं सरोवरें तुडुंब भरतात. अशाच प्रकारचें हें भव्य मानस सरोवर आहे.

आपली सतलज नदी याच सरोवरांतून उगम पावते. ब्रह्मपुत्रेचा उगमहि याच सरोवराच्या परिसरांतून होतो. तिबेटांतून निघणाऱ्या बहुतेक नद्यांचे उगम अशाच सरोवरांतून झालेले आहेत. त्यामुळें त्या नद्यांना पाण्याचा पुरवठा भरपूर असतो आणि तो शुद्ध असतो.

मानस सरोवरांतील पाणी अगदीं शुद्ध आहे. त्यांत गढूळ पाण्याचा अंश मुळींच दिसत नाहीं. पाण्याकडे दृष्टि टाकली, तर त्या सरोवराचा तळ स्वच्छ दिसतो.

मानस सरोवराचें वातावरण अत्यंत पवित्र आहे. सूर्योदय व सूर्यास्त यावेळचे या सरोवरांतील देखावे अत्यंत सुंदर म्हणजे स्वर्गीय, दिसतात. त्या वेळेस स्नान करून सूर्यास अर्घ्य देणारे मुनिजन आम्हांस तेथें दिसले ! पहाटेसच हे योगी स्नान करून योगसाधनास बसलेले असतात. बहुतेकांचें मौनव्रत असतें. त्यांतील कांहीं जण अत्यंत विद्वान् व तत्त्वज्ञ आढळतात.

मानस सरोवराच्या सभोंवार तपस्वी लोकांसाठीं गुहा आहेत. तेथें आमचे भिक्षुमित्र जप करण्यांत मग्न होऊन गेले. मीहि यथाशक्ति जपजाप्य करीत बसूं लागलों.

## तिबेटी भाषा :

माझ्या सारखेच कांहीं यात्रेकरू तेथें आलेले होते. त्यांना तिबेटी भाषा चांगली अवगत होती. अशा लोकांकडून मीं तिबेटी भाषेची अधिक माहिती करून घेतली.

तिबेटी भाषेंत पांचच स्वर आहेत. त्या भाषेची लिपिहि वेगळी आहे. त्या भाषेचें व्याकरण ' सितुलाम ' या विद्वानानें लिहिलें आहे. या तिबेटी भाषेंतहि तीन पोट भाषा आहेत. त्यांपैकीं तिबेटची राजधानी ल्हासा येथें चालू असलेली तिबेटी भाषा सर्वसामान्य भाषा समजतात.

तिबेटी भाषा आणि ब्रह्मदेशाची भाषा यांत बरेंचसें साम्य आढळतें. तिबेटांत तिबेटी भाषेची वेगळी लिपि चालू आहे. हिंदुस्थानांतून तिकडे बौद्ध भिक्षु धर्माच्या प्रचारासाठीं गेले. त्यांच्या मदतीनें तिबेटांत लिपि सुरू झाली. तिबेटांतील बोलण्याची भाषा आणि लिहिण्याची भाषा ह्यांत फार अंतर आहे. तिबेटी लिपींतील वाङ्मय मुख्यतः धार्मिक आहे.

# पुन्हा प्रवास सुरू

मानस सरोवराच्या मुक्कामांतील आमचे दिवस फार आनंदाचे गेले. तेथें आणखी कांहीं दिवस ध्यान-धारणा करावी, असेंहि मला वाटलें; पण आमच्या भिक्षु मित्रांना ल्हासाकडे लवकर जावयाचें होतें. ते उन्हाळ्याचे दिवस होते. त्या काळची तिबेटची हवा पण सुंदर होती. ती हवा प्रवास करण्यास सुखकर होती. त्यामुळें आम्ही मानससरोवराचें अखेरचें दर्शन घेतलें आणि ल्हासाच्या मार्गाला लागलों.

मानससरोवरापासून ल्हासा हें ठिकाण बरेंच दूर आहे. सुमारें सातशें मैलांचें तें अंतर आहे. तेथून आम्ही चांगले कसलेले तिबेटी वाटाडे घेतले. त्यांनीं बळकट याक जनावरें सामानासाठीं आणि बसण्यासाठीं आणिलीं ! हीं याक जनावरें आपल्याकडील बैलांसारखीं असतात. तीं केसाळ असतात. त्यामुळें त्यांना थंडीचा त्रास होत नाहीं. तिकडील गाईंना वनगाई म्हणतात. त्याहि केसाळच असतात. वनांतून चरण्यासाठीं त्यांचे कळप भटकत असतात.

त्यावेळीं तिकडे सडका नव्हत्या. मोटारी, आगगाड्या यांचा मागमूसहि नव्हता. पायवाटेनेंच मार्ग तोडावयाचा होता. वाटेंत दऱ्या-खोरीं होतीं. मोकळीं सपाट मैदानेंहि लागत असत. ते उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळें तिबेटी भूमि हिरवीगार झाली होती. वनस्पतींना टवटवी आलेली होती. जंगलांतील वृक्षांना जिवंतपणा आलेला होता.

आम्ही ल्हासाला एक महिन्यांत पोहोंचूं, अशा हिशेबानें मार्ग तोडीत होतों. वाटेंत लहान लहान खेडीं लागत. तेथील खेडूतांपैकीं कांहींजण शेतीचा व्यवसाय करीत असत.

## तिबेटांतील शेती :

तिबेटांतील शेती उन्हाळ्यांत खुलून दिसते. शेतीला पाण्याचा पुरवठा पुरेसा असतो. पण जमीनच कसदार आढळत नाहीं. खोलगट भागांतील जमीन शेतीच्या उपयोगी असते. पठारावर मात्र हिरवेंगार गवत सर्वत्र आढळतें.

नद्यांच्या कांठच्या खोऱ्यांतील जमीन मात्र बरीच सुपीक आहे. तिकडे मुख्य उत्पन्न सातूचें दिसत होतें. भातशेतीहि कांहीं ठिकाणीं दिसली.

कांहीं कांहीं ठिकाणीं छोट्या छोट्या फळबागाहि दिसत होत्या. त्या फळांत पीच फळें होतीं. मनुकाहि होत्या. एकंदरींत पाहातां तिबेटांत शेतीचें उत्पन्न पुरेसें नाहीं. हिंदुस्थानांतून धान्याचा पुरवठा हिमालयाच्या अवघड अशा खिंडींतून व्यापारीलोक करीत असतात. पण तो पुरवठा कसाहि झाला तरी तिबेटला अपुराच होत असतो.

## तिबेटांतील मेंढ्यांचे कळप :

तिबेटच्या हिरवळीवर चरणारे तिबेटी मेंढ्यांचे कळप आम्हांस दिसत होते. त्यांच्या अंगावरील लोकर लांब आणि अत्यंत मऊ असते. तिचा उपयोग मेंढ्यांना थंडीपासून बचाव करण्यासाठीं आपोआप होतो.

मेंढ्यांच्या लोकरीचें कापड करण्याचे जुन्या पद्धतीचे माग आम्हांला खेडेगांवांतून आढळून आले. गरीब लोक लोकर असलेली मेंढ्यांची कातडीं पांघरतात.

तिकडील लोकांना धान्याचा पुरवठा कमी होतो, पण तिकडे मेंढ्या मुबलक असल्यामुळें त्यांच्या मांसावर तिकडील लोकांचें जीवन चालतें. त्यामुळें खेडोपाडीं मेंढ्या पाळणारे खेडूत आढळून येतात.

तिबेटी लोक बौद्धमताचे आहेत. पण त्यांच्या खाण्यांत मांसाहाराचें प्रमाण पुष्कळ असतें. त्यामुळें ते लोक शरिरानें बळकट असतात. काटकपणा-मुळें ते श्रमहि भरपूर करतात. पुरुषांप्रमाणें स्त्रियाहि बळकट असतात. ते लोक आडव्या अंगाचे आहेत. त्यांची उंची मात्र पांच फुटांपेक्षां फारशी अधिक नसते.

आम्ही मजल दर मजल करीत वाटेनें चाललों होतों. वाटेंत गोड्या पाण्याचीं सरोवरें ठिकठिकाणीं लागत असत. त्यांतील पाणी स्वच्छ होतें. त्या सरोवरांत छानदार मासे दिसत होते ! अनेक रंगांचे मासे पाहून आम्हांला विशेष कुतुहल वाटलें. मेंढ्यांच्या मांसाच्या जोडीला तिबेटी लोकांना हे मासेहि चालत असतील, असें मला वाटलें. तेव्हां मांसाहारी तिबेटी वाटाड्यांना मी विचारलें,

" इतके सुंदर मासे तुम्ही पकडीत कां नाहीं ? तुमच्याकडे हें माशाचें पीक देवानें भरपूर दिलेलें आहे ! "

त्यावर तो वाटाड्या म्हणाला, " आम्ही बहुधा मासे खात नाहीं ! " हें त्याचें उत्तर ऐकून मला आश्चर्य वाटलें. पण मेंढ्या वगैरे प्राण्यांचें भरपूर मांस मिळत असल्यामुळें त्यांना माशांची जरूरी वाटत नाहीं, हें माझ्या लक्षांत येण्यास फारसा वेळ लागला नाहीं.

आम्ही तिबेटांतील खेड्यांत रात्रीचा मुक्काम करीत होतों. तिकडे प्रत्येक गांवीं उतारूंना उतरण्यासाठीं मठ असतो. खेडूत लोक भिक्षूंना



आदरानें वागवितात. मी व आमचे बरोबरचे भिक्षु शाकाहारी होतो. आमचे वाटाडे मांसाहारी होते. ते आपल्या ओळखीच्या घरीं खाणें पिणें करीत असत.

लहानसें खेडें असलें, तरी तेथें कसाईखाना वेगळाच असतो. त्याच ठिकाणीं पशूंची हत्या करावयाची असते. दुसऱ्या कोठेंहि पशू कापण्यास धर्मानें मनाई आहे. कायद्यानेंहि मनाई आहे.

कसाईखान्यांत देखील यज्ञांतील हिंसेप्रमाणें ती हत्या करावी लागते. बौद्ध भिक्षु मंत्र म्हणूनच प्राण्यांची हत्या करतात आणि तें मांस पवित्र म्हणून खात असतात !

प्रत्येक खेड्यांत लामा असतात. त्यांना खेड्यांतील धर्मगुरु समजतात. त्यांच्या ताब्यांत पुष्कळ जमीन असते. हे लामा नेहमीं ज़प करण्यांत मग्न झालेले असतात.

## तिबेटांतील वाटमारी :

आमचा प्रवास आठ दिवस झाला. ह्या आठ दिवसांत कोठेंहि त्रास झाला नाहीं. पठारावरील मार्ग संपला. नंतर डोंगराळ भाग सुरू झाला. एका खिंडींतून आम्ही चाललों होतों. जवळपास माणसांची वस्ती नव्हती. त्या खिंडींत आम्हांला चोरट्यांनीं गांठलें. त्यांनीं आरडा ओरड करून आम्हांस भयभीत केलें. तशांत ती वेळ संध्याकाळची होती. खिंड ओलांडण्यास फार वेळ लागणार नव्हता. पण त्या चोरट्यांचा हल्ला आमच्यावर झाला होता. आम्ही भीतीनें गारठून गेलों. आमच्या तोंडचें पाणी पळालें !

पण हे वाटमारे आमच्या वाटाड्यांच्या माहितीचे निघाले. वाटाड्यांनीं आम्हांस पूर्वींच सूचना दिली होती. त्याप्रमाणें आम्ही आमच्या बरोबर तंबाखू अफू व गांजा हे जिन्नस आणले होते. आमच्या वाटाड्यांनीं आमच्याजवळून हे जिन्नस घेतले आणि ते त्या चोरट्यांना बहाल केले ! ते वाटमारे खूष झाले ! त्यांनीं मोठ्या आनंदानें आमचा निरोप घेतला. आमचा जीव भांड्यांत पडला.

ते वाटमारे लोक दूर निघून गेले. नंतर आमचा एक तिबेटी वाटाड्या आम्हांस म्हणाला,

" हे वाटमारे आमच्या माहितीचे होते. त्यामुळें त्यांनीं लूटमार केली नाहीं. आपण दिलेले जिन्नस त्यांना आवडले व ते खूष होऊन निघून गेले, हें खरें आहे. "

आणखीहि तो म्हणाला,

" आमचे लोक प्रवाशांना लुटतात, हें खरें आहे. पण प्रवासी जर भिक्षु असेल किंवा जप करीत चाललेला असेल अथवा धर्मवाक्यें म्हणणारा असेल, तर मात्र त्याच्याजवळ असलेले सर्वच जिन्नस हे वाटमारे लुटीत नाहींत ! तीन दिवस पुरेल इतकें अन्न प्रवाशाजवळ ठेवितात आणि बाकीचें लुटून नेतात ! असा हा आमच्या धर्माचा नियम आहे.

आम्ही ती खिंड ओलांडली. पुढें आम्हांला एक चांगलें खेडें लागलें. तेथें आमची बडदास्त खुद्द लामाच्याच मठांत झाली. त्यानें आमच्या भिक्षूंबरोबर पुष्कळ वेळ चर्चा केली.

प्रातःकाळीं आम्ही नेहमींप्रमाणें चहाची तयारी केली. वाटेंत आम्हांस दूध मिळत होतेंच. तेथेंहि दूध मिळालें. आम्ही आपला चहा बनविणार, इतक्यांत लामानेंच आम्हांला चहाला बोलाविलें. आमच्या भिक्षूंना हा धर्माचा शुभ प्रसादच वाटला ! मीहि चहा न घेतांच निघालों, तेव्हां आमचा एक भिक्षुमित्र म्हणाला,

" आपण आपला नेहमींचा चहा येथेंच घेऊं, नंतर चहासाठीं लामाकडे जाऊं. इकडील चहा तयार करण्याची रीत वेगळी आहे. तिनें तुमची नेहमींची चहाची तलफ भागणार नाहीं ! "

मी उत्सुकतेनें लामांच्या मठांतील चहा करण्याची पद्धत पाहात होतों. आपल्याप्रमाणें ते लोक चहांत साखर घालीत नाहींत ! ऊन पाण्यांत चहा घालतात आणि तो चांगला तास दोन तास कढवितात ! नंतर त्यांत चवीसाठीं थोडें मीठ टाकतात ! पुढें त्या उकळत्या चहांत लोणीहि टाकतात ! कांहीं लोक त्यांत सातूचें पीठहि घालतात ! नंतर तो चहा बराच वेळ घुसळतात ! अशाप्रकारें तयार झालेला चहा ते लोक पितात.

आम्ही लामांचे पाहुणे होतों. तेव्हां तो चहा आम्हांला घ्यावा लागला ! तसें म्हटलें तर त्याची चव तितकीशी वाईटहि नव्हती ! आम्हांला असल्या चहाची संवय नसल्यामुळें तो चहा घशाखालीं लवकर उतरत नव्हता. तिबेटी लोक तो चहा अत्यंत गोडीनें पीत होते.

चहापानानंतर मद्य पिण्याचीहि त्यांच्यांत संवय असल्याचें आम्हांस दिसलें. आमच्यापैकीं कोणी त्या मद्याचा आस्वाद घेतला नाहीं. कारण, मद्य पिण्याची आम्हांला मुळीं संवयच नव्हती.

—:[]::[]:—

## ७ : ल्हासा नगरीकडे

आम्ही बराच प्रवास करून ल्हासा नगरीजवळ आलों. तरीहि ती नगरी शंभर मैल दूर होती. आतां वाटेनें रहदारी पण वाढलेली होती.

एके ठिकाणीं आमचा मुक्काम पडला. तेथें कोणी एक खेडूत सोनें, चांदी विकण्याचा धंदा करीत होता. आम्ही बऱ्या स्थितीचे असल्याचें त्यानें हेरलें आणि सोनें व चांदी यांच्या गोळ्या घेऊन तो आमच्याकडे आला! मला आश्चर्य वाटलं! मला सोन्याची परीक्षा करितां येत होती. तें सोनें चांगलें होतें. त्यावेळीं मी त्या, व्यापाऱ्यास म्हटलें,

" हा माल वाटमारींत तुम्हांला मिळाला नाहीं ना ? "

" छे! हो! " तो व्यापारी निषेधपूर्वक बोलला. " अहो! आमच्या तिबेटांतील वाळूंत सोन्याचे कण आहेत! पुष्कळ ठिकाणीं चांदी पण सांपडते. पारा देखील या देशांत आढळून येतो. त्यामुळें वाळूच्यां कणांतून आम्ही सोनें, चांदी काढतों. हें सोनें काढण्याचें काम बरेंच कठीण आहे. पण कांहीं लोकांचा तो धंदा आहे. त्यांनीं काढलेलें सोनें आम्ही व्यापारी विकत घेतों व तें असें तुमच्यासारख्यांना विकीत असतों. "

तिबेटांत सोनें, चांदी पुष्कळ सांपडेल, अशी माहिती आम्हांस मिळाली. पण तेथील सरकार म्हणजे मुख्य लामा. जपजाप्य करण्यांतच धन्यता मानतात! त्यामुळें नवीन सुधारणा तेथें होत नाहींत. या प्रदेशांत मौल्यवान् धातू आहेत. पण त्या जमिनींतील काढणार कोण ? असो.

आम्ही उत्सुकतेनें त्या व्यापाऱ्याबरोबर डोंगराच्या पायथ्याशीं गेलों. तेथील वाळू तपासली. पाण्याचा उपयोग करून आम्हीं पाहिलें. खरोखरच त्या भूमींत सोनें भरपूर सांपडेल, अशी आमची खातरी झाली. त्या व्यापाऱ्याकडून आम्ही थोडें सोनें खरेदी केलें. तें फार स्वस्तांत मिळालें. ल्हासाला गेल्यानंतर आम्ही बुद्धाचा प्रसाद म्हणून त्या सोन्याची आंगठी करून घेणार आहोंत.

आम्ही आतां बरेंच पुढें आलों होतों. ल्हासा पन्नास मैलांवर राहिलें होतें. वाटेंत एक खोलगट खोरें लागलें. तेथें चांगलीं पिकें आम्हांला दिसलीं.

तेथें प्रथमच आम्ही गव्हाचें पीक पाहिलें. गव्हाचें उत्पन्न थोडें कां होईना, त्या प्रदेशांत होतें, हें आम्हांस कळून आलें.

त्या भागांत रेशमी किडे पाळण्याचा धंदाहि आम्हांला दिसला. रेशीम तयार करण्याचा व्यवसायहि तिबेटांत आहे, ही माहिती आम्हांस समजली.

लोकरीचे कापड तयार करण्याचा जुना धंदा तेथें सर्व ठिकाणीं आहे. कांहीं कसबी लोक काश्मीरप्रमाणें लोकरीच्या शालीहि तयार करतात, अशीहि माहिती आम्हांस समजली. तिबेटांत जमीन अफाट आहे. भयंकर थंडीमुळें ती लागवडीस आणतां येत नाहीं, त्यामुळें तेथील वस्ती फार विरळ आहे. पण जशी रशियानें सैबेरियांतील थंड हवेंतहि सुधारलेल्या पद्धतीची शेती चालू केली आहे, तशी जर तिबेटांत योजना होईल, तर हा देश अन्नधान्याच्या बाबतींत तरी स्वयंपूर्ण होईल, असें मला वाटल्याशिवाय राहिलें नाहीं.

आतां आम्ही ल्हासापासून अगदीं नजीक म्हणजे वीस पंचवीस मैलां-वर आलों होतों. नगरांत उपयुक्त होतील, असे जिन्नस तयार करण्याचीं कामें ल्हासा नजीकच्या मोठ्या गांवांत चालत असतात.

आपल्याकडे सुवासिक उदबत्त्यांचा धंदा चालतो. देवापुढें उदबत्त्या पेटवून ठेविल्या म्हणजे तेथें सुवास पसरतो आणि मनास प्रसन्नताहि वाटते. तिबेटांत तशीच पद्धत आम्हांस दिसली. तेथील सुवासिक वनस्पतींचा कुटून कुटून लगदा करितात ! आणि त्याच्या कांड्या बोरूच्या ताटाप्रमाणें लांबलचक तयार करितात. त्या वाळल्या म्हणजे बारीक काठीसारख्या बांधून ठेवितात. त्या गिऱ्हाइकास विकतात. बुद्धाच्या प्रार्थना मंदिरांत अशा मोठ्या आकाराच्या ह्या उदबत्त्या सतत पेटत ठेवितात. त्यामुळें मंदिरांतील हवा शुद्ध आणि सुगंधी राहाते.

असा धंदा ल्हासानजीकच्या गांवांत मोठ्या प्रमाणांत चालतो. शिवाय तेथील मातीचीं सुंदर भांडीं, पेले इत्यादि जिन्नस करण्याचा धंदाहि तिकडे बराच आहे. लांबलांबचे यात्रेकरू असले जिन्नस प्रसाद म्हणून खरेदी करून नेतात ! या नगांची किंमतहि ल्हासा नगरांतील व्यापारी भरपूर घेतात ! जसें गिऱ्हाईक दिसेल, त्याप्रमाणें असल्या वस्तूंची किंमत वाढते किंवा कमी होत असते !

## ल्हासा नगरींत प्रवेश :

शेवटी आम्ही ल्हासा नगरींत पोहोंचलों. आमच्या बरोबरच्या भिक्षूंना अत्यंत आनंद झाला. बौद्ध भिक्षूंना बुद्धगयेंत आल्यासारखें वाटलें. बौद्धांचें भारतांतील गया हें प्रसिद्ध पवित्र स्थान आहे. त्याचप्रमाणें ल्हासा हे बौद्ध भिक्षु आपलें धर्मपीठ मानतात.

ल्हासा नगरींत प्रवेश करण्यास आम्हांला प्रथम थोडीशी अडचण उत्पन्न झाली. पण धार्मिक कारणासाठींच तेथें आम्ही आलों आहोंत, हें आमच्या भिक्षूंनीं तेथील अधिकाऱ्यांना पटवून दिलें. त्यामुळें आम्हांस त्या नगरींत प्रवेश करतां आला आणि तेथें कांहीं दिवस राहाण्याची परवानगीहि मिळाली.

ल्हासा शहर अगदीं जुन्या पद्धतीचें आहे. तुम्हांस तेथें अद्यापिहि नवीन पद्धतीची इमारत दिसावयाची नाहीं. घरांची किंवा मठांची बांधणी चिनी पद्धतीची आहे, असें तेथील जाणते लोक सांगतात. शाक्य मुनींचें मंदिर भव्य आहे. ल्हासांत यात्रेकरू भिक्षूंना उतरण्यासाठीं मोठे मोठे मठ आहेत. हे मठ पंढरपूर, आळंदी येथील मठांची व धर्मशाळांची आठवण करून देतात.

तेथें स्वच्छतेची जाणीव फार कमीच दिसते. कडक थंडीमुळें कां असेना, तेथील लोक आठ आठ दिवस स्नान करीत नाहींत, त्यामुळें त्यांची राहाणी घामट वाटते. त्यांच्या घरांतील बैठकीची जागा प्रशस्त असते. लोकर असलेलीं कातडीं बैठकीसाठीं असतात. त्यांचें स्वयंपाक-घर फार अस्वच्छ वाटलें. बायका धडधाकट असतात. त्यांचा कामाचा उरक दांडगा असतो. त्यांच्या मानानें पुरुष ऐदी वाटतात. ते लामांच्या मठांत जाऊन जपजाप्य करीत असतात.

## भिक्षूंची जप करण्याची पद्धत :

भिक्षूंची जप करण्याची रीत तर फार मजेची वाटली. लामांच्या मठांत आम्ही गेलों. तेथील मठांत भिक्षु मंडळी एक प्रकारचें नळकांडें राहाटावर घालून तो राहाट एकसारखा फिरवीत असलेले आम्हांस दिसले. कोणत्याहि मठांत गेलें असतां हाच प्रकार चाललेला आम्हांस दिसला. मला या कृत्याचा बोध होईना, यासाठीं मी माझ्या भिक्षुमित्रांना विचारलें,

“ रहाट फिरविण्याचा हा काय प्रकार चाललेला आहे बरें ? ”

“ बरें विचारलेंत. ” माझा भिक्षु मित्र हसत हसत बोलला. “ आमची ही एक जलद जप करण्याची योजना आहे. सर्व पापें नाहींशीं करणारा आमच्या धर्मांत एक मंत्र सांगितला आहे. ”

## “ ॐ माणि पद्मे हुम् ”

“ हा तो मंत्र होय. हा मंत्र एका कागदावर किंवा पत्र्यावर लिहितात. तो लिहिलेला कागद किंवा पत्रा एका नळकांड्यांत घालतात. तें नळकांडें

राहाटासारख्या चक्रावर लावितात. त्या नळकांड्याचे प्रत्येक फेऱ्यास एक जप होतो, अशी आमची श्रद्धा आहे. हे फेरे जितके जास्त होतील, तितकें अधिक पुण्य आम्हांस लाभतें. त्यामुळें आमचीं सर्व पापें नाहींशीं होत असतात. ”

निरनिराळ्या धर्मांत जप करण्याच्या किंवा तप करण्याच्या पद्धति वेगवेगळ्या असतात. त्याचप्रमाणें पापपुण्याच्याहि समजुती भिन्न भिन्न असतात. एवढेंच मी समजलों आणि याविषयीं मी त्या भिक्षु मित्राशीं अधिक चर्चा केली नाहीं.

## अध्ययन व अध्यापन :

तिबेटांत सार्वत्रिक शिक्षणाची सोय मला दिसून आली नाहीं. ल्हासा हें जगांतील बौद्धांचें धार्मिक क्षेत्र आहे. त्यामुळें तेथील बौद्धांच्या मठांत बुद्ध धर्माच्या अध्ययनाची चांगली व्यवस्था दिसली. अध्यापक वर्गहि धर्माच्या अध्ययनांत वाकबगार असतो.

आधुनिक शास्त्रांच्या शिक्षणाचा तेथें प्रवेश नाहीं. पूर्वीं हिंदुस्थानांतून तिकडे विद्वान् भिक्षु जात असत. त्यांनीं वैद्यकीय शिक्षणाचा प्रसार तिकडे केला होता. त्याचप्रमाणें शिल्पशास्त्राचें शिक्षण तिकडे ते देत होते. पण पुढें पुढें हिंदुस्थानशीं असलेलें हें दळणवळण कमी कमी होऊं लागलें. तेव्हांपासून तिबेटांतील लोकांचें अध्यापनहि मागें पडलें.

अलीकडे भौतिक सुधारणांच्या जागतिक कल्पना तिकडे डोकावूं लागल्या आहेत. पण त्यांनीं अद्यापि तिकडे मूळ धरलेलें मला दिसलें नाहीं !

## दलाई लामांचा राजवाडा :

ल्हासांतील जवळच्या एक टेकडीवर तिबेटचे दलाई लामा म्हणजे मुख्य लामा यांचा राजवाडा आहे. अर्थात् येथें बुद्ध धर्माचे मुख्य पीठ आहे. तेथील प्रार्थनामंदिर तर फार भव्य आहे. दलाई लामा हेच राज्याचे मुख्य अधिकारी असतात. म्हणजे त्यांच्याकडेच सर्व राज्यकारभार असतो. ते तेथील राजे आहेत. त्यांचें मंत्रिमंडळहि आहे. पंचम लामा म्हणून एक दुसरा लामा असतो. त्याचे अधिकार मुख्यतः मुलकी असतात. दोन्ही लामांच्या विचारानें राज्यकारभार चालतो.

त्या राजवाड्यांत धार्मिक ग्रंथ पुष्कळ आहेत. तें वहुतेक तिवेटी व पाली भाषेंतील आहेत. त्यांचें संशोधन करण्यास आधुनिक विद्वानांनाहि पुष्कळच वाव आहे. पण या सर्व गोष्टी दलाई लामांच्या तंत्रानें झाल्या पाहिजेत.

## लामांची निवड :

दलाई लामा समाधिस्त झाले म्हणजे त्यांच्या गादीवर वसणाऱ्या लामाची निवड करावयाची असते. मुख्य लामा संन्यस्त असतात. त्यामुळें त्यांच्या मुलाबाळांचा प्रश्नच उत्पन्न होत नाहीं.

समाधिस्त झालेले लामा कोठें तरी अवतार घेतात, अशी तेथील भिक्षूंची समजूत आहे. वौद्ध धर्मास पुनर्जन्माची कल्पना मान्य आहे. तेव्हां सवंध तिवेटभर नवा लामा शोधीत मुख्य मुख्य भिक्षु हिंडतात आणि समाधिस्त झालेल्या लामाचा तोंडवळा असलेलें मूल शोधून काढितात. त्यालाच दलाई लामाच्या गादीवर वसवितात ! अर्थात् या अज्ञान लामाच्या धार्मिक शिक्षणाची काळजी हे मंत्रिमंडळांतील भिक्षु घेत असतात. लामा सज्ञान होईपर्यंत हें भिक्षूंचें मंत्रिमंडळ राज्यकारभार चालवितें.

## लामांचा आशीर्वाद :

ल्हासांतील दलाई लामांच्या राजवाड्यांत आम्ही गेलों. त्यावेळीं दलाईलामा अनेकांना दर्शन देऊन आशीर्वाद देत होते. दलाई लामा प्रसन्न दिसत होते. आमच्या भिक्षुमित्रांच्या वरोवर मीहि लामांचें दर्शन घेतलें.

लामांच्या आशीर्वाद देण्याच्या पद्धति मोठ्या मजेच्या आहेत, असें मला वाटलें. ज्या योग्यतेचा भक्त दर्शनास येईल, त्या योग्यतेचा आशीर्वाद हे धर्मगुरु देत असतात ! अर्थात् हे आशीर्वाद भिन्न भिन्न प्रकारचे असतात.

कांहीं श्रेष्ठ प्रतीच्या भक्तांना हे धर्मगुरु लामा डोक्यास डोकें लावून आशीर्वाद देतात !

कांहांना आपले दोन्ही हात पुढें करून आशीर्वाद देतात.

तिसरा आशीर्वाद देण्याचा प्रकार म्हणजे एकच हात पुढें करून दिलेला आशीर्वाद होय !

चौथा प्रकार अगदींच वेगळा असतो. हे धर्मगुरु आपल्या काठीचें टोंक दर्शनास आलेल्या भक्तांच्या डोक्यास लावून आशीर्वाद देतात !

माझ्या वाट्यास हा प्रकार आला. मला अगदीं जवळून लामा पाहावयाचे होते, माझी इच्छा सफल झाली, याचेंच मला समाधान वाटलें.



लामाची भेट

तिकडे जो कोणी धार्मिक कृत्यें करीत असेल, अशा सर्व साधारण धर्मगुरूंना लामा म्हणतात. असे लामा प्रत्येक गांवीं असतात. सर्वांत श्रेष्ठ धर्मगुरु आणि राज्याचे मुख्य सत्ताधारी दलाईलामाच होत.

## तिबेटांतील कराची वसुली :

तिबेटांत रयतेपासून कर नाण्यांच्या रूपांत घेत नाहींत. तो मालाच्या रूपानें घेतात. त्यामुळें तिकडील सरकारी तिजोरींत पैसे नसतात. तर धान्य, व खाण्यास उपयोगी पडणारे इतर पदार्थ भरलेले असतात. तिजोरींत म्हणजे कोठारांत गहूं, भात, सातू अशाप्रकारचीं धान्यें असतातच. शिवाय पीठ, लोणी, फळें असले खाण्याचे पदार्थहि असतात ! म्हणूनच या कर घेण्याच्या कचेरीस तिकडे लामांचें स्वयंपाकघर असेंहि म्हणतात !

याखेरीज लोकर, रेशीम, कापूस, कापड इत्यादि सर्व जिन्नस कराच्या वसुलींत येतात ! या जिन्नसांचे दर वेळोवेळीं बदलत असतात. वजनें, मापें यांच्यांतहि वरचेवर वदल होतो. यामुळें एकंदरींत वसुलीमध्यें स्थिरपणा राहात नाहीं.

नोकरांचे पगार नाण्याच्या रूपांत देत नाहींत. जिन्नसांच्या रूपांत देत असतात !

तिकडे सोनें, रूपें, पारा, टाकणखार इत्यादि खनिज पदार्थ सांपडतात. त्याकडे कोणाचें विशेष-लक्ष गेलेलें नव्हतें. अलीकडे असल्या वस्तूंचें महत्त्व कळूं लागल्यामुळें सोन्या-रुप्याच्या लहान लहान खाणी चालविण्याकडे राज्य-कर्त्यांचें लक्ष गेलेलें आहे. त्यामुळें दलाई लामाजवळील सोनें, चांदी यांचा साठा वाढूं लागला आहे ! त्याचा उपयोग उपयुक्त कारखाने काढण्यांत केव्हां होईल तेव्हां होवो !

## तिबेटांतील न्यायदान :

तिबेटांत न्यायदानाचें काम धर्मांत सांगितलेल्या नियमाप्रमाणें चालतें. न्यायकोर्टें गुन्हेगारांस तुरुंगाच्या शिक्षा देत नाहींत. जुन्या कायद्यांत सांगितल्या-प्रमाणें अपराध्याचे डोळे काढीत असत ! हातपाय तोडीत असत ! असल्या

प्रकारच्या कडक शिक्षा दलाई लामांनीं बंद केलेल्या आहेत. खुनाच्या अपराधाबद्दलहि फटके मारण्याची शिक्षा देतात किंवा अपराध्यास हद्दपारहि करितात !

## तिबेटांतील संरक्षण व्यवस्था :

तिबेटांतील राज्य म्हणजे धर्माचें राज्य समजतात. त्यामुळें तेथें पगारी सैन्य पुष्कळ काळ नव्हतेंच. अलीकडे पगारी सैन्य ठेऊन संरक्षणाची व्यवस्था करण्याची आवश्यकता राज्यकर्त्यांना वाटूं लागली आहे. याचें कारण मुख्यतः तिबेटावर चीनच्या स्वाऱ्या होऊं लागल्या हें होय.

हें सैन्य भिक्षूंपैकींच असतें. तिबेटांत भिक्षूंचे दोन प्रकार आहेत. एक प्रकार धार्मिक अध्ययन करणारांचा आहे. दुसरा प्रकार लढवय्या भिक्षूंचा आहे. हेच भिक्षु सरकारच्या सैन्यांत आहेत.

हें भिक्षूंचें सैन्य सुधारलेल्या पद्धतीचें मात्र नव्हे. सुधारलेल्या देशांतील सैन्याप्रमाणें ही कवायती फौज नव्हे. त्यांचें शिक्षण म्हणजे लाठीच्या मारामारीचें शिक्षण होय किंवा एखाद्या टेकडीवर जाऊन तेथील लहान मोठे धोंडे घेऊन त्यांचा नेम मारण्याचें शिक्षण होय. आधुनिक शस्त्रास्त्रांची त्यांना इतके दिवस माहितीहि नव्हती. अलीकडे असल्या साधनांची थोडी ओळख त्यांना होऊं लागली आहे, इतकेंच ! दुसऱ्या महायुद्धामुळें त्यांचे या बाबतींत डोळे उघडूं लागण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत.

## दोन भिक्षूंच्या हातीं कारभार ! :

तिबेटांत वर्षाच्या आरंभीं तीन आठवडे दलाईलामा व त्यांचें मंत्रिमंडळ यांच्या हातीं राज्यकारभार नसतो. तो निवडक दोन भिक्षूंच्या हातीं सोपविण्यांत येतो, अशी ही कायमची वहिवाट आहे. या तीन आठवड्याच्या मुदतींत ते भिक्षु राज्यकारभारांत अनेक प्रकारच्या उलाढाली करूं शकतात !

आपल्याकडे शिराळशेठची कथा प्रसिद्ध आहे. कोणा एका राजानें शिराळशेठींच्या हातीं फक्त साडेतीन घटकाच राज्यकारभार सोपविला. त्या

सत्तेचा उपयोग शिराळशेठींनीं अत्यंत उत्तम केला. तशी स्थिति मात्र तिबेटात दिसून येत नाहीं !

आणखी किती तरी गोष्टींचें निरीक्षण मला तेथें करावयाचें होतें. पण उन्हाळा संपत आल्यामुळें माझ्या भिक्षु मित्रांनीं हिंदुस्थानांत चलण्याची घाई चालविली. मी इकडे ल्हासा व त्याच्या सभोंवारचा प्रदेश पाहात होतों. तर तिकडे आमचे भिक्षु मित्र जपजाप्य करण्यांत मग्न झाले होते. त्यांच्या घाईमुळें आम्ही ल्हासा नगर सोडलें. त्या पुण्यनगरीचा निरोप घेऊन आम्ही जवळच्या मार्गानें हिंदुस्थान गाठण्याचें ठरविलें.

—:□:—

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम 3८६३२ दि.
क्रमांक ....३२८.......

वाटेनें आम्हांला अनेक सरोवरें लागलीं. ब्रह्मपुत्रा नदी ओलांडण्याचें बिकट कार्य झाल्यानंतर पुढील वाटेंत थोडा झिम झिम पाऊसहि लागला. गार वारे अंगास झोंबूं लागले. पाऊस व धुकें यांमुळें आम्हांस बराच त्रास झाला. आमचे एक सोबती वाटेंत तापानें आजारी पडले. त्यामुळें आम्हांला एका खेड्यांत मुक्काम करावा लागला. सुमारें आठ दहा दिवस आम्हांला तेथें राहावें लागलें.

## अनेक दिवस स्नान न करणें :

त्या खेड्यांतील एका कुटुंबाच्या घरीं आम्ही राहिलों होतों. त्या कुटुंबांतील मंडळींनीं आम्हांस पुष्कळ मदत केली. आम्हांस प्रेमानें वागविलें. त्यांच्या निकट सहवासामुळें त्यांच्या सामाजिक स्थितीची आम्हांस बरीच कल्पना आली.

मी दररोज स्नान करीत होतों. याचें आश्चर्य त्या तिबेटी कुटुंबाला वाटत होतें. ते लोक पुष्कळ दिवसांत स्नान करीत नाहींत. त्यामुळें त्यांच्या अंगावर मळ साचतो. कडक थंडीमुळें स्नान न करण्याची रूढी पडली. पण अस्वच्छता वाढून त्वचा रोग वाढले. कढत पाण्यानें स्नान करणें कसें अवश्य आहे, हें आम्ही त्या कुटुंबास पटवून दिलें

## एका स्त्रीचें अनेक पुरुषांशीं लग्न :

तिबेटांत पुरुषांपेक्षां स्त्रियांची संख्या कमी असावी, असें दिसलें. सुधारलेल्या पद्धतीप्रमाणें तेथें खानेसुमारी झालेली नाहीं. त्यामुळें आकडेवार माहिती मला येथें देतां येत नाहीं. पण तेथील सामाजिक रीतिरिवाजावरून या अनुमानास बळकटी येते.

आम्हांला त्या खेड्यांत दिसून आलें कीं, एका स्त्रीला अनेक पुरुषांशीं लग्न लावून चांगला संसार करतां येतो ! त्यावेळीं आपआपसांत संगनमत करून ते पुरुष लग्न ठरवितात ! दोन किंवा तीन भावांतहि एकच बायको

असूं शकते. अशीच पद्धत तिबेटांत पुष्कळ ठिकाणीं आहे. हीहि माहिती आम्हांला तेथें कळली.

अर्थात् तिकडे स्त्रियांना अधिक मान मिळतो. तिकडे कामकरी पुरुष आणि स्त्रिया यांना सारखीच मजुरी मिळते.

## तिबेटांतील जाति-धर्म :

मोठमोठ्या सरदारांच्या पदरीं घोडे असतात. स्त्रियांना देखील घोड्यावर चांगलें बसतां येतें. तिबेटांत सरदार घराण्यास अधिक मान असतो. त्याच घराण्यांतील पुरुष प्रधानमंडळांत असतात. प्रत्येक गांवांत अशा सरदारांचीं एक दोन तरी घरें असतात. सामान्य लोकांचा वर्ग म्हणजे वैश्यवर्ग होय. हाहि चांगला सुखी वर्ग आहे.

तिबेटांत वरिष्ठ व कनिष्ठ जाती आहेत. त्यांच्यांत सहभोजन होत नाहीं! परस्पर लग्न व्यवहारहि होत नाहींत.

## कस्तुरी मृग :

आमच्या बरोबरच्या भिक्षूंचा आजार बरा झाल्यानंतर आम्ही पुन्हा प्रवास सुरू केला. प्रथम दार्जिलिंग गांठावें आणि तेथून बुद्धगयेस जावें, असा आमच्या मित्रांचा विचार ठरला होता. म्हणून आम्ही झपाझप मार्ग तोडीत चाललों होतों.

आम्ही हिमालयाच्या चढणीवरून जात असतां वाटेंत कस्तुरी मृगांचा तांडा लागला. कस्तुरी मृगांचे पाय बारीक व अगदीं ताठ असतात. त्यांचें घ्राणेंद्रिय तीक्ष्ण असतें. त्यांच्या अंगावर भरपूर दाट केस असतात.

मृगांतील नराच्या पोटाखालीं बेंबीजवळ पिशवी असते. तींत काळसर व चिकट असा एक पदार्थ असतो. तो पदार्थ म्हणजे कस्तुरी होय. हा सुगंध म्हणजे सुगंधाचा राजाच होय.

## तिबेटचा इतिहास :

तिबेटचा इतिहास अकराव्या शतकापासून प्रसिद्ध आहे. या देशावर साम्राज्यशाहीचा ताबा चालविण्याचा चीनचा प्रयत्नहि जुनाच आहे. पण हा

वाटेनें आम्हांला अनेक सरोवरें लागलीं. ब्रह्मपुत्रा नदी ओलांडण्याचें बिकट कार्य झाल्यानंतर पुढील वाटेंत थोडा झिम झिम पाऊसहि लागला. गार वारे अंगास झोंबूं लागले. पाऊस व धुकें यांमुळें आम्हांस बराच त्रास झाला. आमचे एक सोबती वाटेंत तापानें आजारी पडले. त्यामुळें आम्हांला एका खेड्यांत मुक्काम करावा लागला. सुमारें आठ दहा दिवस आम्हांला तेथें राहावें लागलें.

## अनेक दिवस स्नान न करणें :

त्या खेड्यांतील एका कुटुंबाच्या घरीं आम्ही राहिलों होतों. त्या कुटुंबांतील मंडळींनीं आम्हांस पुष्कळ मदत केली. आम्हांस प्रेमानें वागविलें. त्यांच्या निकट सहवासामुळें त्यांच्या सामाजिक स्थितीची आम्हांस बरीच कल्पना आली.

मी दररोज स्नान करीत होतों. याचें आश्चर्य त्या तिबेटी कुटुंबाला वाटत होतें. ते लोक पुष्कळ दिवसांत स्नान करीत नाहींत. त्यामुळें त्यांच्या अंगावर मळ साचतो. कडक थंडीमुळें स्नान न करण्याची रूढी पडली. पण अस्वच्छता वाढून त्वचा रोग वाढले. कढत पाण्यानें स्नान करणें कसें अवश्य आहे, हें आम्ही त्या कुटुंबास पटवून दिलें

## एका स्त्रीचें अनेक पुरुषांशीं लग्न :

तिबेटांत पुरुषांपेक्षां स्त्रियांची संख्या कमी असावी, असें दिसलें. सुधारलेल्या पद्धतीप्रमाणें तेथें खानेसुमारी झालेली नाहीं. त्यामुळें आकडेवार माहिती मला येथें देतां येत नाहीं. पण तेथील सामाजिक रीतिरिवाजावरून या अनुमानास बळकटी येते.

आम्हांला त्या खेड्यांत दिसून आलें कीं, एका स्त्रीला अनेक पुरुषांशीं लग्न लावून चांगला संसार करतां येतो ! त्यावेळीं आपआपसांत संगनमत करून ते पुरुष लग्न ठरवितात ! दोन किंवा तीन भावांतहि एकच बायको

असूं शकते. अशीच पद्धत तिबेटांत पुष्कळ ठिकाणीं आहे. हीहि माहिती आम्हांला तेथें कळली.

अर्थात् तिकडे स्त्रियांना अधिक मान मिळतो. तिकडे कामकरी पुरुष आणि स्त्रिया यांना सारखीच मजुरी मिळते.

## तिबेटांतील जाति-धर्म :

मोठमोठ्या सरदारांच्या पदरीं घोडे असतात. स्त्रियांना देखील घोड्यावर चांगलें बसतां येतें. तिबेटांत सरदार घराण्यास अधिक मान असतो. त्याच घराण्यांतील पुरुष प्रधानमंडळांत असतात. प्रत्येक गांवांत अशा सरदारांचीं एक दोन तरी घरें असतात. सामान्य लोकांचा वर्ग म्हणजे वैश्यवर्ग होय. हाहि चांगला सुखी वर्ग आहे.

तिबेटांत वरिष्ठ व कनिष्ठ जाती आहेत. त्यांच्यांत सहभोजन होत नाहीं ! परस्पर लग्न व्यवहारहि होत नाहींत.

## कस्तुरी मृग :

आमच्या बरोबरच्या भिक्षूंचा आजार बरा झाल्यानंतर आम्ही पुन्हा प्रवास सुरू केला. प्रथम दार्जिलिंग गांठावें आणि तेथून बुद्धगयेस जावें, असा आमच्या मित्रांचा विचार ठरला होता. म्हणून आम्ही झपाझप मार्ग तोडीत चाललों होतों.

आम्ही हिमालयाच्या चढणीवरून जात असतां वाटेंत कस्तुरी मृगांचा तांडा लागला. कस्तुरी मृगांचे पाय बारीक व अगदीं ताठ असतात. त्यांचें घ्राणेंद्रिय तीक्ष्ण असतें. त्यांच्या अंगावर भरपूर दाट केस असतात.

मृगांतील नराच्या पोटाखालीं बेंबीजवळ पिशवी असते. तींत काळसर व चिकट असा एक पदार्थ असतो. तो पदार्थ म्हणजे कस्तुरी होय. हा सुगंध म्हणजे सुगंधाचा राजाच होय.

## तिबेटचा इतिहास :

तिबेटचा इतिहास अकराव्या शतकापासून प्रसिद्ध आहे. या देशावर साम्राज्यशाहीचा ताबा चालविण्याचा चीनचा प्रयत्नहि जुनाच आहे. पण हा

देश चीनच्या ताब्यांत कधींच गेला नव्हता ! भारतास स्वातंत्र्य मिळाल्यानंतर चीन व भारत यांच्यामध्यें तिबेटवर चीनचा अधिकार मान्य करण्यांत आला ! त्याच्याच जोरावर चीननें तिबेटावर जुलूम चालविला ! त्याचाच परिणाम म्हणजे तिबेटांतील दलाई लामांना तिबेट सोडण्याचा प्रसंग आला ! चीन हा देश कम्युनिस्ट असल्यामुळें तिबेटांतील धार्मिक बौद्धांवर जुलूम होत असल्याच्या बातम्याहि मधून मधून कानांवर येत असतातच !

पूर्वीं रशियांत राजशाही होती. झार हा त्यांचा बादशहा होता ! त्या झारचा डोळा तिबेटावर होताच. लॉर्ड कर्झन हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल होते, तेव्हां ब्रिटिशांनीं छोटीशी मोहीमहि तिबेटवर केली होती. त्यावेळीं इंग्रजांनीं कांहीं हक्क तिबेटांत मिळविले होते. पण भारत सरकारनें त्यावेळचे ते मिळालेले हक्क सोडून दिलेले आहेत !

हा अलीकडचा इतिहास आहे. मी तिबेटांतून परत हिंदुस्थानांत आलों त्यावेळचा हा नव्हे. तिबेटचा प्रवास संपवून मी दार्जिलिंगला आलों. त्या वेळेला मला हायसें वाटलें. इतका तो कठीण प्रवास आहे. सध्यां चीनचा ताबा तिबेटवर असल्यामुळें तिकडे प्रवास करणें आतां अत्यंत कठीण झालेलें आहे.

असो.

शुभं भवतु !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ... वि: ...
दि: ...

REFBK-0012998